पशुसल्ला

# जनावरांचा उष्माघातापासून असा करा बचाव



**डॉ. गणेश काळुसे**
विषय विशेषज्ञ
(पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय),
(मो.नं. ९८२२२४७८९५)
कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा

उष्माघातापासून बचावासाठी सर्वप्रथम जनावरे सावलीच्या ठिकाणी बांधावीत आणि त्यांना दिवसातून जास्तीत जास्त पाणी पाजावे. वाढत्या तापमानाचा गोठ्यातील सूक्ष्म वातावरणावर विपरित परिणाम होऊन जनावरांमध्ये ताण येतो. जनावराची उत्पादनक्षमता, प्रजननक्षमता आणि उत्पादनाची गुणवत्ताही कमी होते. त्यामुळे मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते.

उष्णतेच्या मध्यम ते तीव्र तणावाच्या परिस्थितीमध्ये जनावरांना स्वच्छ, थंड पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध करावे; जेणेकरून शरीराचे तपमान सामान्य मर्यादित ठेवण्यास मदत होईल. शरीरातील क्षारांचे प्रमाण टिकवून ठेवण्यासाठी मिठाचे चाटण द्यावे. जनावरांना सावली पुरवता येते परंतु उष्ण वारे रोखता येत नाहीत. त्यासाठी गोठ्याच्या छपरावर पाण्याचा फवारा मारावा. गोठ्यात हवेच्या नियमनासाठी खिडक्यांची व्यवस्था असावी.



दोन्ही शिंगाच्या मध्ये ओले कापड ठेवावे व त्यावर वारंवार थंड पाणी टाकावे. भिंती तट्ट्याच्या असतील, तर त्यावरसुद्धा पाणी शिंपडावे. जनावरांच्या शरीरावर पाणी शिंपडावे. स्थानिक पशुवैद्यकाचा सल्ला घ्यावा.

**चारा नियोजन : हायड्रोपोनिक्स चारा**

मका, सातू, गहू व बाजरी यांच्यापासून हायड्रोपोनिक्स चारा तयार करता येतो. मोड आलेले धान्य ट्रेमध्ये पसरवून त्यावर वेळोवेळी पाण्याचा फवारा मारून हायड्रोपोनिक्स चारा दहा दिवसांत तयार करता येतो. असा चारा प्रति जनावर दहा किलोपर्यंत वापरावा. यात सहज पचणाऱ्या घटकांचे व पाण्याचे प्रमाण अधिक असल्याने आहारात इतर वाळलेला चाऱ्याचा समावेश असावा; जेणेकरून पचन योग्य रितीने होईल. फुटलेले दाणे वापरू नयेत, कारण त्यातून त्यास बुरशीचा प्रादुर्भाव होऊ शकतो. तसेच ज्वारीचा वापर करू नये, कारण ज्वारीच्या कोवळ्या अंकुरात हायड्रोसायनिक ॲसिड असते; जे जनावरांना अपायकारक असते. पारंपरिक पद्धतीत बी मातीत रुजताना त्यात साठविलेली ऊर्जा ही सुरवातीला जास्तीत जास्त मुळांच्या वाढीसाठी वापरली जाते. परंतु हायड्रोपोनिक्समध्ये हीच उर्जा अंकुर वाढविण्यासाठी वापरली जाते, त्यामुळे त्याची जोमदार व वेगवान वाढ होते. **ॲझोला** : टंचाई काळात फक्त चारा पिकेच नाही तर पशुखाद्याचेही दर वाढतात, त्यामुळे जनावरांना योग्य प्रमाणात पशुखाद्य देणे परवडत नाही. त्याचबरोबर सकस चारा उपलब्ध नसेल तर प्रथिने, क्षार, खनिजे तसेच जीवनसत्त्वांची कमतरता होते. यावर पर्याय म्हणून उच्च प्रथिने आणि क्षार खनिजे असलेल्या ॲझोलाचा वापर दुधाळ जनावरांच्या आहारात करता येईल. दुधाळ जनावरांना १-१.५ किलोपर्यंत ॲझोला रोज खाऊ घालता येतो. याव्यक्तिरिक्त जनावरांना दुष्काळी भागात वड, पिंपळ, कडूनिंब, बोर यांसारख्या झाडांचा पाला, पाने सुद्धा देता येतात. ■